लोकमत

# सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी आर. के. कामत

## शिवाजी विद्यापीठात होते अधिष्ठाता

- लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी कोल्हापूरचे असणारे डॉ. आर. के. कामत यांची निवड करण्यात आली. राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी ही नियुक्ती केली आहे. डॉ. कामत सध्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणीस यांचा कार्यकाल आज शुक्रवारी (दि. ५) पूर्ण होत आहे. त्यामुळे नवीन कुलगुरूंची निवड होईपर्यंत या पदाचा कार्यभार

> सोलापूर विद्यापीठात नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. कुलपतींनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांचे आभार.
>
> **- आर.के. कामत,** प्रभारी कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

डॉ. कामत यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. शुक्रवारी कामत हे पदभार स्वीकारणार आहेत. डॉ. कामत यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक शास्त्र विभागाचे प्रमुख होते. ते ऑस्ट्रोलियातील व्हिक्टोरियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे मानद प्राध्यापक आहेत.

05 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंचा इतिहास रशियन, इटालियन भाषेतून

## शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय...' या ध्येयाने आपली संपूर्ण हयात लोककल्याणासाठी खर्च करणाऱ्या लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती जगभरातील लोकांना व्हावी, या उद्देशाने राजर्षी शाहू चरित्राची निर्मिती विविध प्रादेशिक व परदेशी भाषांमध्ये करण्यात आली आहे. यापैकी रशियन व इटालियन भाषेतील शाहू चरित्रांचे प्रकाशन राजर्षी शाहू छत्रपती स्मृतिशताब्दी पूर्तीच्या निमित्ताने होणार आहे.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतिकारी राजा' या चरित्र ग्रंथाच्या रशियन व इटालियन अनुवाद-ग्रंथाचे प्रकाशन शनिवार, दि. ६ मे रोजी सकाळी ११ वाजता शाहू सिनेट सभागृहात होणार आहे. प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते व शाहू महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी




विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे शाहू संशोधन केंद्र व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा होणार आहे.

शाहू चरित्राचा रशियन अनुवाद डॉ. मेघा पानसरे व प्रा. तत्याना बीकवा आणि इटालियन अनुवाद डॉ. अलेस्सांद्रा कोन्सोलारो या विदुषींकडून केला गेला आहे. प्रकाशन सोहळ्यात रशियन व इटालियन भाषेतील अंशमात्र वाचन केले जाणार आहे. या समारंभास कोल्हापुरातील सर्व शाहूप्रेमी नागरिक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

**२५ भाषांत शाहूचरित्र जगभर**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती देणाऱ्या 'राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतिकारी राजा' या ग्रंथाची निर्मिती डॉ. जयसिंगराव पवार यांनी केली आहे. विविध भारतीय व विदेशी भाषेत याचे भाषांतर करून तो विविध जाती-धर्मीय, प्रांत व भाषीय लोकांपर्यंत पोहोचविण्याचे अखंड कार्य सुरू आहे. आतापर्यंत भारतातील कन्नड, कोकणी, तेलगू, उर्दू, हिंदी या भाषेत याचे भाषांतर झाले आहे. तर इंग्रजी, जर्मन या भाषेतून जागतिक पातळीवर पोहोचवले आहे. रशियन व इटालियन या भाषांतून ते अधिक व्यापक होणार आहे. गुजराती, बंगाली व सिंधी भाषांतील शाहूचरित्रे लवकरच प्रकाशित होणार आहेत. १५ भारतीय भाषांत व १० विदेशी भाषांत अशा एकूण २५ भाषांत हा शाहूचरित्राचा प्रकल्प पूर्ण होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठात उद्या राजर्षी शाहू महाराज यांच्या रशियन, इटालियन चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्र व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित शाहू चरित्राचे राजर्षी शाहू रशियन व इटालियन चरित्र अनुवाद ग्रंथाचा (रशियन : डॉ. मेघा पानसरे व प्रा. तत्याना बीकवा, इटालियन डॉ. अलेस्सांद्रा कोन्सोलारो) प्रकाशन सोहळ्याचे दि. ६ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे प्रकाशन सोहळा होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 MAY 2023
पुढारी

# शालेय विद्यार्थ्यांचे शिकणे होणार मनोरंजक!

## शिवाजी विद्यापीठाकडून अँड्रॉईड ॲप्लिकेशन विकसित; किचकट संकल्पना समजून घेणे सोपे


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांनी शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाचा वापर करून आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अँड्रॉईड ॲप्लिकेशन विकसित केले आहे. यामुळे विज्ञानातील क्लिष्ट, किचकट संकल्पना समजावून घेणे शक्य होणार आहे. प्रणालीतील गेमीफिकेशनमुळे विद्यार्थ्यांना शिकणे अधिक मनोरंजक, मजेदार व सहज वाटणार आहे.

पुढारी विशेष

जिल्हा नियोजन समितीकडून शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रा. सुधीर देसाई व प्रा. डॉ. वैशाली भोसले यांना नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाचा वापर या प्रकल्पासाठी ७५ लाख ४० हजार रुपयांचे अनुदान मंजूर झाले. यातून प्राध्यापकांनी अँड्रॉईड ॲप्लिकेशन विकसित केले आहे. आभासी वास्तविकतेचा उपयोग करून शालेय शिक्षणात नवीन अध्यापन-अध्ययन शैली विकसित करणे प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे.

विद्यार्थ्यांनी राज्य अभ्यास मंडळाने दिलेल्या पुस्तकातील चित्र मोबाईलवर अँड्रॉइड ॲप्लिकेशनवर पाहिले असता त्या चित्रास अनुरूप त्रिमितीय मॉडेल आभासी स्वरूपात समोर येते. थ्री-डी आभासी मॉडेलसोबत मुले संवाद करू शकतात. प्रणालीमध्ये सध्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र विषयांच्या १०४ संकल्पनांचे आधुनिक आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाच्या आधारे सुलभीकरण करण्यात आले आहे. ॲप्लिकेशनद्वारे विज्ञान विषयातील आभासी प्रयोगशाळा वास्तविक जगात आणता येतात.




वास्तविकता तंत्रज्ञान वापरून विकसित केलेले अँड्रॉईड ॲप्लिकेशन.

संगणक, मोबाईल, इंटरनेट व आभासी वास्तविकता या तंत्रज्ञानावर आधारित हे अध्ययनशास्त्र आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल होऊ शकतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून खेड्यांमध्ये गुणवत्तापूर्वक शिक्षण पोहोचवण्याचे काम ॲप्लिकेशन करणार आहे. हे ॲप्लिकेशन विद्यार्थ्यांना स्वतःच्या स्मार्ट फोनद्वारे वापरता येते. तसेच गुगल प्ले स्टोअरवर लवकरच मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ॲप्लिकेशन वापराचे प्रथम शिक्षकांना प्रशिक्षण दिल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षकांमार्फत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

> तत्कालीन पालकमंत्री आ. सतेज पाटील यांनी ही प्रणाली अभियांत्रिकी ऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी तयार करावी अशी सूचना केली. त्यामुळे हे शक्य झाल्याबद्दल त्यांचे आभार! या तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना विज्ञान विषयात गोडी निर्माण होण्यास हातभार लागेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च तंत्रज्ञान विनामूल्य उपलब्ध होणार आहे.
>
> **- प्रा. सुधीर देसाई,**
> शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील परीक्षा अलीकडे घेणार

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व पुढील शैक्षणिक प्रवेश व नोकरीच्या संधी यांच्यापासून विद्यार्थी वंचित राहू नयेत यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने परीक्षा अलीकडे घेण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन परीक्षा प्रारंभ तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठाने १७ एप्रिल रोजी मार्च-एप्रिल २०२३ मधील उन्हाळी सत्रातील विद्यापीठ परीक्षा प्रारंभ तारखांचे वेळापत्रक जाहीर केले. वेळापत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर विद्यार्थी, पालक, प्राचार्य व शिक्षक संघटनांनी वेळापत्रकाबद्दल विद्यापीठाशी संपर्क साधून परीक्षा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू करण्याची मागणी केली. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा अलीकडे होणार असल्याचे गृहीत धरून परीक्षेची तयारी सुरू करावी, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले आहे.

### परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ


विद्यापीठाच्या तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. विलंब शुल्कासह १० मेपर्यंत अर्ज करता येणार आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने शनिवारी संलग्न महाविद्यालये, अधिविभाग प्रमुखांना काढले आहे.

सकाळ



## राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष सांगता

# राजर्षी शाहू रशियन, इटालियन चरित्र ग्रंथाचे उद्या प्रकाशन




**राजर्षी शाहू रशियन चरित्र ग्रंथाचे मुखपृष्ठ**

कोल्हापूर, ता. ४ : ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती : एक समाजक्रांतिकारी राजा' या चरित्राचा अनुवाद रशियन आणि इटालियन या ग्रंथामध्ये केला आहे. या अनुवादित ग्रंथाचे प्रकाशन राजर्षी शाहू छत्रपती स्मृती शताब्दी पूर्तीच्या निमित्त शनिवारी (ता. ६) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठातील सिनेट सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते होणार आहे. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असणार आहेत. विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीतर्फे प्रकाशनाचा कार्यक्रम होणार आहे.

शाहूचरित्राचा रशियन अनुवाद डॉ. मेघा पानसरे आणि प्रा. तत्याना बीकवा यांनी, तर इटालियन अनुवाद डॉ. अलेस्सांद्रा कोन्सोलरो यांनी केला आहे. प्रकाशन सोहळ्यात रशियन, इटालियन भाषेतील अंशमात्र वाचन केले जाणार आहे. शाहूप्रेमी नागरिक, विद्यार्थ्यांनी या ग्रंथ प्रकाशनाच्या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. पवार यांनी केले. दरम्यान, आतापर्यंत डॉ. पवार यांनी मराठी शिवाय कन्नड, कोंकणी, तेलगू, उर्दू, हिंदी या भारतीय भाषांत आणि इंग्लिश, जर्मन या विदेशी भाषांमध्ये शाहूचरित्र प्रकाशित केले आहे. गुजराती, बंगाली, सिंधी भाषांतील शाहूचरित्र लवकरच प्रकाशित होणार आहेत. १५ भारतीय आणि १० विदेशी भाषांमध्ये शाहूचरित्र प्रकाशित केले जाणार आहे.

सकाळ

# 'मे' अखेरच्या आठवड्यात विद्यापीठ पदवी परीक्षांचा प्रारंभ

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाच्या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांचा प्रारंभ मेच्या अखेरच्या आठवड्यात होणार आहे. विद्यार्थी, पालक, प्राचार्य आणि शिक्षकांनी केलेल्या विनंतीनुसार विद्यापीठाने या परीक्षांपूर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकांच्या १५ दिवस अगोदर घेण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाकडून दोन दिवसांत जाहीर केले जाणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर परीक्षा १२ जूनपासून घेण्याचे नियोजन करून त्याबाबतचे वेळापत्रक एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात जाहीर केले होते. त्यावर प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक संघटनांनी विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधून या परीक्षा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू करण्याबाबत विनंती केली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये. पुढील प्रवेश आणि नोकरीच्या संधीपासून विद्यार्थी वंचित राहू नयेत म्हणून प्रशासनाने परीक्षा लवकर घेण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या तारखा दोन दिवसांमध्ये जाहीर केल्या जातील. असे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

0 5 MAY 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत वारणा महाविद्यालयास अकरा पारितोषिके

प्रतिनिधी
वारणानगर

शिवाजी विद्यापीठ आयोजित वार्षिक नियतकालिक स्पर्धेत येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या वारणा २०१९-२० या नियतकालिकेने तब्बल ११ पारितोषिके प्राप्त केली. नियतकालिकाच्या संपादन समितीतील डॉ. एस. एस. जाधव, डॉ .आर. बी. पाटील, डॉ. प्रिती शिंदे-पाटील, प्रा. बी. डी. आम्रंगे, प्रा. सौ. वर्षा रजपूत यांनी अभ्यासपूर्ण अशी नियतकालिकेची मांडणी केली आहे. त्याची दखल घेऊन श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. वासंती रासम, प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी संपादक मंडळाचे अभिनंदन केले आहे.

कोरोना महामारीत जीवाची परवा न करता डॉक्टर, नर्स, पोलीस प्रशासन, सफाई कामगार या सर्व कोरोना योद्धांनी एकजूटीने अनेकांचे जीव वाचवले. या अतुलनीय सेवेबद्दल सर्व कोरोना योद्धांना वारणा २०१९-२० हा नियतकालिका अंक समर्पित केला आहे. गेली २७ वर्षे सातत्याने बक्षीसे मिळवण्याची परंपरा यंदाच्या नियतकालिकेने कायम राखली गेली आहे. यापूर्वी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकासह अनेक पारितोषिके वारणा नियतकालिकेने मिळवली आहेत. यंदाच्या नियतकालिकेसाठी हिंदी विभागाचे प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी संपादित केलेल्या विविध विषयातील लेखनाला पाच पारितोषिके मिळाली आहेत. याचबरोबर मराठी लेखनाला दोन, इंग्रजी लेखनाला




एक, विज्ञान विभागाला दोन आणि कला-कौशल्य विभागाला एक अशी एकूण ११ पारितोषिके घोषित झाली आहेत. शिवाजी विद्यापीठाकडून रोख रक्कम प्रमाणपत्र अशा स्वरुपात बक्षीस दिले जाणार आहे.

हिंदी विभागातील अश्विनी जाधव हिने 'डॉ. श्रीराम लागू एक महान चरित्र अभिनेता', व्यक्तिचित्रण रेखाटले आहे. त्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. स्वाती वडरने लिहिलेल्या 'जल ही जीवन' या लेखालाही पहिल्या क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले आहे. अरुण शिंदेने विज्ञानावर आधारित लिहिलेल्या 'तुलसी' वनस्पतीचे महत्व या लेखाला दुसरा, दर्शना काळेने 'दस बरस के बाद' या ग्रामीण भागातील प्रवास वर्णनाला तिसरा क्रमांक दिला आहे. सैनिकी जीवनावर कोमल बादरेने लिहिलेल्या 'मैं सैनिक', कवितेलाही तिसरा क्रमांक मिळाले आहे.

मराठी विभागाचे संपादन डॉ. बी. के. वानोळे यांनी केले आहे. शिवानी घोंगडेने लिहिलेल्या 'आजी एक अक्षय ऊर्जा', पुस्तक परीक्षणाला दुसरा व 'गांधी आणि गांधीवाद', संशोधन पर लेखाला तिसरा तर विज्ञानावर आधारित 'निसर्गातील बदल एक चिंतन', या लेखाला दुसरा क्रमांक देण्यात आला आहे. इंग्रजी विभागाचे संपादन डॉ. दिनेश सातपुते यांनी केले असून साक्षी बच्चेने लिहिलेल्या पारंपारिक बियाणांची जपणूक करणाऱ्या 'राहीबाई पोपीरे', यांच्या चरित्र-चित्रणाला तिसरा क्रमांक मिळाला आहे. विज्ञान विभागाचे संपादन प्रा. व्ही. एस. पाटील यांनी केले असून श्रुतिका जोशीने लिहिलेल्या 'गुगल माझा गुरु', या माहितीपूर्ण लेखाला तिसरा तर कला कौशल्य विभागातून सुजय नायकवडी यांनी 'कॅमेऱ्याची नवलाई' या टॅग लाईनखाली काढलेल्या छायाचित्रांना दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षेला मे अखेर प्रारंभ



■ शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या होत्या. परंतू विद्यार्थी, पालक व शिक्षक संघटनांनी परीक्षा मे महिन्यात घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार मे महिन्याच्या अखेर परीक्षा घेण्यात येतील. या परीक्षांच्या तारखा येत्या काही दिवसात जाहीर केल्या जातील. याची नोंद विद्यार्थी, प्राध्यापक व पालकांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

विद्यापीठ मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील परीक्षा वेळेत झाल्या तर विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेता येईल. तसेच नोकरीच्या ठिकाणी कोणतीही अडचण निर्माण होवू नये म्हणून मे महिन्याच्या अखेरीस सर्व परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. विद्यार्थी हित लक्षात घेवून विद्यार्थी, पालक, प्राचार्य आणि शिक्षक संघटनांच्या मागणीचा मान ठेवत विद्यापीठ या परीक्षा लवकरच घेणार आहे. परीक्षेच्या नवीन तारखा विद्यापीठ लवकरच जाहीर करणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.